**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : अमोल रामदास मेंगडे,

वय : ३८ वर्षे, व्यवसाय : शेती,

राहणार : मेंगडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके</u>**

१. मी आरोपींना ओळखतो, ते आमच्या गावातील आहे. दि.२०/०५/२०२४ रोजी दुपारी ४.३० च्या आमच्यामध्ये मेंगडेवाडी येथे किरकोळ बाचाबाची झाली होती. त्यानंतर दि.२१/०५/२०२४ रोजी मी पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली होती.

२. आता मला दि.२१/०५/२०२४ रोजीची फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. फिर्यादीतील सहीपुर्ता **निशाणी क्र.१७** देण्यात येते. आता मला दि.२१/०५/२०२४ रोजीची छापिल फिर्याद दाखवली. त्यावर माझीच सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. फिर्यादीतील सहीपुर्ता **निशाणी क्र.१८** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी वकीलांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

३. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०/०५/२०२४ रोजी आरोपी बबलु उर्फ तेजस बाळासाहेब मेंगडे व ओंकार दशरथ मेंगडे हे हातामध्ये लाकडी काठी घेऊन आले. त्यांनी मला शिवीगाळ करुन हातातील लाकडी काठीने माझ्या पाठीमध्ये व खांद्यावर मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सायंकाळी ५.०० च्या सुमारास मी व माझा भाऊ असे दोघे

घराच्या अंगणात बसलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी ओंकार मेंगडे व बबलु मेंगडे हातामध्ये बिअरची बाटली अर्धवट फोडून घेऊन आले. हे म्हणणे खरे नाही की, ओंकारने माझ्या गचुंडीने धरुन उजव्या हातातील बिअरची अर्धवट फोडलेली बाटली माझ्या डोक्यात व खांद्यावर मारुन दुखापत केली. हे म्हणणे खरे नाही की, तेजस सुदाम मेंगडे हा भांडणे सोडविण्यासाठी आला होता. त्यावेळेस बबलु मेंगडे याने त्याच्या हातातील बिअरची अर्धवट फोडलेली बाटली तेजस मेंगडे याच्या उजव्या हाताच्या पंजावर मारुन दुखापत केली.

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला व तेजस सुदाम मेंगडे याला मारहाण करुन दुखापत केल्याने मी पारगाव पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची फिर्याद ही मी वाचुन बघितली, त्यातील मजकुर मला खरा व बरोबर वाटला म्हणुन मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींमध्ये आणि माझ्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे आणि त्यानुसार संयुक्तिक तडजोड पुरशिस **निशाणी क्र.१५** वर दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्यामध्ये तडजोड झाली आहे म्हणुन आरोपीला शिक्षा होवु नये यासाठी मी आजरोजी न्यायालयासमोर खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. एन. आर. निघोट</u>**

५. **नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. २२/०१/२०२६**
**घोडेगाव**